कोल्हापूर : घोडावत विद्यापीठाचा पदवीदान समारंभ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाला. यावेळी अध्यक्ष संजय घोडावत, विनायक भोसले, डॉ. एम. टी. तेलसंग, डॉ. एन. के. पाटील, डॉ. श्रीनिवास बाळकुडी.

आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी सज्ज व्हावे : डॉ. शिर्के

संजय घोडावत विद्यापीठाचा दुसरा पदवीदान समारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत कौशल्य विकासही आत्मसात करणे गरजेचे आहे. कौशल्य विकास हा शैक्षणिक क्षेत्रातील मूलभूत कणा आहे, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

भविष्यात विद्यापीठाकडून लागेल ती मदत करू, असे आश्वासनही त्यांनी दिले. संजय घोडावत विद्यापीठाच्या दुसऱ्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी घोडावत विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत होते.

विद्यार्थ्यांना जीवनात अनेक संकटे येतील; पण त्या संकटाना सामोरे जाता आले पाहिजे. संधी व आव्हाने या गोष्टी यशाच्या राजमार्गातील कणा आहेत, असे संजय घोडावत यांनी सांगितले. घोडावत याच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी विश्वस्त विनायक भोसले, कुलगुरू डॉ. एम. टी. तेलसंग, कुलसचिव डॉ. एन. के. पाटील, परीक्षा नियंत्रक डॉ. श्रीनिवास बाळकुडी, पी. ए. देसाई, डॉ. यू. पी. जाधव, डॉ. ए. डी. सावंत, डॉ. आबिद सलाली, प्रा. संजयकुमार इंगळे, डॉ. वाय. एल. गिरी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याहस्ते विद्यापीठात ध्वजारोहण

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. ए. एम. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, आयक्यूएसीचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कोल्हापूर : ध्वजारोहणप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी

व्ही. एन. शिंदे, अनुप जत्राटकर यांना राज्य वाङ्मय पुरस्कार

साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून घोषणा : स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र घरपोच प्रदान होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या 'आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया' या पुस्तकाला राज्यस्तरीय 'महात्मा जोतीराव फुले पुरस्कार', तर लेखक, दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांच्या 'निष्पर्ण पिंपळाच्या छायेत' या एकांकिका संग्रहास 'विजय तेंडुलकर पुरस्कार' गुरुवारी जाहीर झाला. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून या पुरस्कारांची घोषणा झाली.

व्ही. एन. शिंदे

अनुप जत्राटकर

राज्य शासनातर्फे उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान केले जातात. या अंतर्गत सन २०१९ या वर्षासाठी डॉ. शिंदे यांच्या पुस्तकाला प्रौढ वाङ्मय विज्ञान व तंत्रज्ञान (संगणक व इंटरनेटसह) या विभागातील पुरस्कार जाहीर झाला. या पुरस्काराची रक्कम एक लाख रुपये आहे. डॉ. शिंदे यांनी सन २०१९ मध्ये 'आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया' हे पुस्तक लिहिले. त्यात आवर्त सारणीतील सर्व ११८ मूलद्रव्यांची माहिती आणि आवर्त सारणीचा इतिहास उलगडून मांडला आहे. लेखक-दिग्दर्शक जत्राटकर यांना प्रथम प्रकाशन (नाटक/एकांकिका) विभागातून पुरस्कार जाहीर झाला. त्याची रक्कम ५० हजार रुपये आहे.

'लोकमत'मुळे पुस्तक साकारले

'लोकमत'मधील विज्ञान सदरातील 'धन्यवाद मेंडलीव' या एका लेखाच्या माध्यमातून हे ४३६ पानांचे पुस्तक लिहिण्याचे बीज माझ्यामध्ये रुजले. त्यासह विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या जिज्ञासेचा त्यात मोठा भाग आहे. यापुढेही लिहीत राहण्यासाठी हा पुरस्कार ऊर्जा देणारा असल्याची प्रतिक्रिया डॉ. शिंदे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाचा साहित्य पुरस्कार डॉ. शिंदे, जत्राटकर यांना जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येणारे सन २०१९ मधील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना 'अवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया' या ग्रंथास महात्मा जोतीराव फुले १ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर झाला.

तसेच स्व. यशवंतराव चव्हाण पुरस्कार राज्य वाङ्मय पुरस्कारांतर्गत देण्यात येणारा विजय तेंडुलकर पुरस्कार अनुप जत्राटकर यांच्या 'निष्पर्ण पिंपळाच्या छायेत' या एकांकिका संग्रहास जाहीर करण्यात आला. रोख पन्नास हजार व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

शिंदे

जत्राटकर

यापूर्वी डॉ. शिंदे यांना त्यांच्या साहित्य कृतीसाठी दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. व्ही. एन. शिंदे, अनुप जत्राटकर यांना राज्य शासनाचा वाङ्मय पुरस्कार

प्रतिनिधी

कोल्हापूर

महाराष्ट्र शासनातर्फे सन २०१९ या वर्षासाठी डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या 'आवर्त सरणी व मूलद्रव्यांची दुनिया' या ग्रंथास महात्मा ज्योतिराव फुले पुरस्कार तर लेखक–दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांच्या 'निष्पर्ण पिंपळाच्या छायेत' या एकांकिका संग्रहास विजय तेंडुलकर पुरस्कार जाहीर झाला आहे.

डॉ. व्ही. एन. शिंदे

अनुप जत्राटकर

डॉ. शिंदे यांनी 'एककांचे मानकरी', 'असे घडले भारतीय शास्त्रज्ञ', 'हिरव्या बोटांचे किमयागार' अशी पुस्तके लिहली आहेत. शिक्षण, तंत्रज्ञान, शेती, पाण्याची भुजल पातळी आदी विषयावर त्यांचे लिखान आहे. 'आवर्त सरणी व मूलद्रव्यांची दुनिया' या ग्रंथात ११८ मूलद्रव्यांची माहिती आणि आवर्त सरणीचा इतिहास लिहला आहे.

जत्राटकर हे लेखक–दिग्दर्शक म्हणून गेली १५ वर्षे कार्यरत आहेत. त्यांनी ३० हून अधिक लघुपट, ९ माहितीपट, ३ एकांकिका, २ व्हिडिओ अल्बम आणि एका ऑडिओ अल्बम आदींचे लेखन–दिग्दर्शन केले आहे. त्यांचे दि प्रॉमिस, इपिफनी ऑफ गॅलिलिओ, स्मोकिंग झोन, आणखी किती दिवस?, हुलड आणि मारीश हे लघुपट गाजले आहेत. 'निष्पर्ण पिंपळाच्या छायेत' हा त्यांचा पहिला एकांकिका संग्रह आहे.

यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मयनिर्मितीसाठी देण्यात येणाऱ्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा गुरुवारी करण्यात आली. शफाअत खान, अशोक राणे, डॉ. हमीद दाभोलकर आदींचा पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे. यंदा ३४ साहित्यिकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने यंदाच्या वर्षात देत असलेल्या या पुरस्कार योजनेअंतर्गत २०१९ च्या पुरस्कार स्पर्धेसाठी एकूण १,०७३ प्रवेशिका मंडळास प्राप्त झाल्या होत्या. त्यातील ८४ प्रवेशिका राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेच्या नियमांमध्ये बसत नसल्यामुळे छाननी समितीने बाद ठरविल्या, तर ९८९ पुस्तके परीक्षणार्थ व शिफारशी करण्यासाठी परीक्षकांकडे सोपविण्यात आली होती. या वेळी प्रथम प्रकाशन समीक्षा सौंदर्यशास्त्र या वाङ्मय प्रकारामध्ये परीक्षकांनी पुरस्कारासाठी एकाही पुस्तकाची शिफारस केलेली नाही. करोनाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र पुरस्काराकरिता पात्र साहित्यिकांना थेट घरपोच प्रदान करण्यात येणार आहे. पारितोषिकाची रक्कम त्यांच्या बँक खात्यावर थेट हस्तांतरित करण्यात येईल.

पुरस्कार विजेत्यांची नावे

पुरस्कार	साहित्यिक	पुस्तकाचे नाव	प्रकाशक
१. प्रौढ वाङ्मय - काव्य - कवी केशवसुत पुरस्कार (एक लाख रुपये)	मंगेश नारायणराव काळे	मायावीये तहरीर पोएट्रीवाला	पेपरवॉल मीडिया अँण्ड पब्लिशिंग प्रा.लि.चे इम्प्रिंट, मुंबई
२. प्रथम प्रकाशन - काव्य - बहिणाबाई चौधरी पुरस्कार (५० हजार)	संदीप शिवाजीराव जगदाळे	असो आता चाड	लोकवाङ्मय गृह, मुंबई
३. प्रौढ वाङ्मय - नाटक/एकांकिका - राम गणेश गडकरी पुरस्कार (एक लाख रुपये)	शफाअत खान	गांधी आड्या येतो	पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
४. प्रथम प्रकाशन - नाटक/एकांकिका - विजय तेंडुलकर पुरस्कार (५० हजार)	अनुप जत्राटकर	निर्घृण पिल्लाच्या छायेत	तेजस पब्लिकेशन, कोल्हापूर
५. प्रौढ वाङ्मय - कादंबरी - हरी नारायण आपटे पुरस्कार (एक लाख)	मनोज बोरगावकर	नदीष्ट	वाचाली, मुंबई
६. प्रथम प्रकाशन - कादंबरी - श्री.ना. पेंडसे पुरस्कार (५० हजार)	ज्ञानेश्वर प्रकाश जाधवर	यसन	स्वयंदीप प्रकाशन, पुणे
७. प्रौढ वाङ्मय - लघुकथा - दिवाकर कृष्ण पुरस्कार (एक लाख)	धर्मराज निमसरकर	हुंदक्यांची काहिली	दिलीपराज प्रकाशन, पुणे
८. प्रथम प्रकाशन - लघुकथा - ग.ल. ठोकळ पुरस्कार (५० हजार)	डॉ. विजय जाधव	अस्वस्थ तांडा	वाचाली, मुंबई
९. प्रौढ वाङ्मय - ललितगद्य (ललित विज्ञानासह) - अनंत काणेकर पुरस्कार (एक लाख)	नयना सहस्रबुद्धे	स्त्रीभान	अमेय प्रकाशन, पुणे
१०. प्रथम प्रकाशन - ललितगद्य - ताराबाई शिंदे पुरस्कार (५० हजार)	डॉ. ऐश्वर्या रेवडकर	बिजापूर डायरी	साधना प्रकाशन, पुणे
११. प्रौढ वाङ्मय - विनोद- श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार (एक लाख)	प्रा. अनिल सोनार	गझल	मिस्किली, रजत प्रकाशन, औरंगाबाद
१२. प्रौढ वाङ्मय - चरित्र- न.चि. केळकर पुरस्कार (एक लाख)	अनिता पाटील	सूर्यकोटि समप्रभ द्रष्टा अणुयात्रिक	डॉ. अनिल काकोडकर मनोविकास प्रकाशन, पुणे
१३. प्रौढ वाङ्मय - आत्मचरित्र - लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार (एक लाख)	अशोक राणे	सिनेमा पाहणारा माणूस	संधिकाल प्रकाशन, माईदर
१४. प्रौढ वाङ्मय - समीक्षा/ वाङ्मयीन संशोधन - श्री. के. क्षीरसागर पुरस्कार (एक लाख)	नीलिमा गुंडी	गतकाळची गाज	मौज प्रकाशन गृह, मुंबई
१५. प्रौढ वाङ्मय - राज्यशास्त्र/समाजशास्त्र - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार (एक लाख)	डॉ. हमीद दाभोलकर	विवेकाच्या वाटेवर	राजहंस प्रकाशन, पुणे
१६. प्रौढ वाङ्मय - इतिहास - शाहू महाराज पुरस्कार (एक लाख)	गोपाळ चिप्पलकट्टी	प्राचीन भारतीय संस्कृतीः मूलाधारांच्या शोधात	सदामंगल पब्लिकेशन, मुंबई
१७. प्रौढ वाङ्मय - भाषाशास्त्र/व्याकरण - नरहर कुरुंदकर पुरस्कार (एक लाख)	खंडेराव कुलकर्णी	मराठी व्याकरण : स्वरूप व चिकित्सा	पद्मगंधा प्रकाशन, पुणे
१८. प्रौढ वाङ्मय - विज्ञान व तंत्रज्ञान (संगणक व इंटरनेटसह)- महात्मा जोतिराव फुले पुरस्कार (एक लाख)	डॉ. व्ही.एन. शिंदे	आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया	अक्षर दालन, कोल्हापूर
१९. प्रौढ वाङ्मय - शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय लेखनासह वसंतराव नाईक पुरस्कार (एक लाख)	रमेश जाधव	पोशिंद्याचे आख्यान एक प्रश्नोपनिषद	साधना प्रकाशन, पुणे
२०. प्रौढ वाङ्मय - उपेक्षितांचे साहित्य - लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार (एक लाख)	डॉ. श्रीपाल सबनीस	आदिवासी प्रतिभावंतांचे मराठी साहित्य	दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे
२१. प्रौढ वाङ्मय - अर्थशास्त्रविषयक लेखन - सी.डी. देशमुख पुरस्कार (एक लाख)	डॉ. गुरुदास नूलकर	अनर्थशास्त्र : अर्थशास्त्र पर्यावरण आणि विषमता	मनोविकास प्रकाशन, पुणे
२२. प्रौढ वाङ्मय - तत्त्वज्ञान व मानसशास्त्र - ना.गो. नांदापूरकर पुरस्कार (एक लाख)	मनीषा बाठे	रामदासी मोक्षपट आणि वास्कवी मोक्षपट एक तौलनिक मागोवा	समर्थ मीडिया सेंटर, पुणे
२३. प्रौढ वाङ्मय - शिक्षणशास्त्र- कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार (एक लाख)	परेश जयश्री मनोहर व संतोष शेडकर	शिक्षणाकोंडी	रोहन प्रकाशन, पुणे
२४. प्रौढ वाङ्मय - पर्यावरण - डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार (एक लाख)	अच्युत गोडबोले	अनर्थ विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर?	मनोविकास प्रकाशन, पुणे
२५. प्रौढ वाङ्मय - संपादित/ आधारित रा.ना. चव्हाण पुरस्कार (एक लाख)	संपादक- श्याम माधव धोंड	कवी अनिल यांची संपूर्ण कविता	विजय प्रकाशन, नागपूर
२६. प्रौढ वाङ्मय - अनुवादित - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार (एक लाख)	अनुवादक माधव वझे	प्रायोगिक रंगभूमी : तीन अंक	राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे
२७. प्रौढ वाङ्मय - संकीर्ण (क्रीडासह) - भाई माधवराव बागल पुरस्कार (एक लाख)	डॉ. सुरेश सावरे	शिदोरी	राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे
२८. बालवाङ्मय - कविता बालकवी पुरस्कार (५० हजार)	विलास कांतीलाल मोरे	शाळेला सुट्टी लागली रे	दिलीपराज प्रकाशन प्रा.लि., पुणे
२९. बालवाङ्मय - नाटक व एकांकिका - भा.रा. भागवत पुरस्कार (५० हजार)	सुनंदा गोरे	नवी प्रतिज्ञा	गोदा प्रकाशन, औरंगाबाद
३०. बालवाङ्मय - कादंबरी - साने गुरुजी पुरस्कार (५० हजार)	बबन मिंडे	दौलतबंकी आणि त्याचा खजिना	राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे
३१. बालवाङ्मय - कथा (छोट्या गोष्टी, परीकथा, लोककथांसह) राजा मंगळवेढेकर पुरस्कार (५० हजार)	स्वाती राजे	शोध	रोहन प्रकाशन, पुणे
३२. बालवाङ्मय - सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे) यदुनाथ थत्ते पुरस्कार (५० हजार)	विजय तांबे	बबडू बँकेत	रोहन प्रकाशन, पुणे
३३. बालवाङ्मय - संकीर्ण ना.धों. ताम्हणकर पुरस्कार (५० हजार)	आशा बोकील	अनंत तिची ध्येयासक्ती : बचेंद्रीपाल	आशा बोकील, पुणे
३४. सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार (एक लाख)	अदिती बत	सौदीतले दिवस	पद्मगंधा प्रकाशन, पुणे

महात्मा गांधी विचारमंचतर्फे उद्या निरंजन टकले यांचे व्याख्यान

कोल्हापूर : गांधी अध्यासन, शिवाजी विद्यापीठ आणि मोहनदास करमचंद गांधी विचार मंचच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त प्रसिद्ध गांधीवादी विचारवंत, पत्रकार निरंजन टकले यांचे शनिवारी (ता. ३०) शाहू स्मारक भवन येथे व्याख्यान होणार आहे. ही माहिती गांधी विचार मंचचे अध्यक्ष प्रा. टी. के. सरगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.महात्मा गांधी यांच्याबद्दलचे समज - गैरसमज तसेच गांधीच्या विचारांचे दर्शन व्हावे या दृष्टीने या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. गांधींच्या १५२ व्या जयंतीचे औचित्य साधून या विचार मंचाची स्थापना केली आहे. मंचाच्या माध्यमातून गांधी दर्शनाचा प्रचार होणार आहे. या विचारांचा जागर करण्यासाठी हे व्याख्यान आयोजित केले आहे. या वेळी विचारमंचाकडून घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेच्या पारितोषिकाचे वितरण केले जाणार आहे. गांधी विचार मंचचे संकल्पक प्रभाकर पाटील, मिलिंद पाटील, अभिषेक मिठारी, धीरेंद्र धारड आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ विचारवंत निरंजन टकले यांचे शनिवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गांधी अध्यासन केंद्र आणि मोहनदास करमचंद गांधी विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त ३० जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता विचारवंत, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शाहू स्मारकमध्ये होणाऱ्या या व्याख्यानाचा विषय 'महात्मा गांधीजी–समज आणि गैरसमज' असा आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विचारमंचचे अध्यक्ष प्रा. टी. के. सरगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी मिलिंद पाटील, अभिषेक मिठारी, धीवेंद्र घारड आदी उपस्थित होते.

राजेंद्रनगरात तृप्ती करेकट्टी यांचा प्रयोग : घरातच कचऱ्यापासून खत निर्मिती

टेरेसवर फुलवली शून्य खर्चाची सेंद्रिय शेती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आवडीला थोडी कष्टाची जोड दिली की शेती आणि तीही टेरेसवर कशी उत्तम प्रकारे करता येऊ शकते, याचा धडाच राजेंद्रनगरातील डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वप्रयोगातून घालून दिला आहे. वांगी, कारली, दोडका, भोपळा, टोमॅटो, बिन्स, कोबी, फ्लॉवर, कांदा लसूण, अंजिर, बोर, आंबा, केळी, संत्री, मोसंबी, पेरू, अळू अशा रोज लागणाऱ्या भाज्या आणि फळांनी परसबाग लगडली आहे. विशेष म्हणजे ही सर्व शेती सेंद्रिय आहे.

डॉ. करेकट्टी या शिवाजी विद्यापीठात इंग्रजी विभागप्रमुख आहेत. त्यांची स्वत:ची शेती मिरज व अब्दुललाटमध्ये आहे. राहायला राजेंद्रनगरात असल्यामुळे तेथेही त्यांनी बाग फुलवली. त्यांच्या या बागप्रेमाचे दर्शन गेटमधून आत प्रवेश करण्यापासूनच घडते. दोन मजले चढून वर टेरेसवर गेल्यावर तर फुललेली परसबाग पाहून मन हरखून जाते. हिरवागार कांदा, मेथी, टोमॅटोचे लागलेले गुच्छ, पांढरे शुभ्र फ्लॉवर, कोबी नजरेत भरतात. रोजच्या खाण्यात लागणाऱ्या भाजीपाल्याच्या दोन-चार कुंड्यांतून सुरुवात झालेला हा परसबागेचा पसारा वाढत जाऊन आज जवळपास शंभरच्या वर कुंड्यांवर पोहोचला आहे. लॉकडाऊन काळात मिळालेल्या निवांतपणाचा सदुपयोग करत बागेचा पसारा आणखी वाढवला. रोप लावण्यासाठी रंगाच्या रिकाम्या बादल्यांचा वापर केला आहे.

कचऱ्यापासून खत निर्मिती

१ दुधाच्या रिकाम्या पिशव्या सोडल्या, तर एक काडीचाही कचरा घराच्या बाहेर जात नाही. टेरेसवरच बॅरेल ठेवून त्यात घरातील सर्व खरकटे, कचरा, भाजीपाल्याची देठे, झाडांचा पालापाचोळा साठवला जातो. दीड महिन्याने त्याचे खतात रुपांतर झाले की तोच या कुंड्यांतील झाडांना घातला जातो. एक रुपयाचे बाहेरचे खत आणि औषधही फवारले जात नाही.

२ एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा उत्तम नमुना येथे दिसत असल्याने भाजीपाला, फळे कीडमुक्त आहेत. शंभर टक्के सेंद्रिय खतावर ही सर्व पिके घेतली जात आहेत.

कोणत्याही खर्चाशिवाय केवळ देखभालीतून आम्ही ही परसबाग तयार केली आहे. बाग लावल्यापासून एकदाही भाजीपाला बाहेरून आणलेला नाही. खर्चाच्या बचतीबरोबरच यातून मिळणारे समाधान मोठे आहे.

- डॉ. तृप्ती करेकट्टी, राजेंद्रनगर

पाण्यापासून ऊर्जानिर्मितीवर संशोधन

हायड्रोजनपासून तयार होणारी ऊर्जा बॅटरीत साठवण्याचा अभ्यास

आम्ही कोल्हापुरी

नंदिनी नरेवाडी-पाटोळे :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : नैसर्गिक इंधनसाठा कधी ना कधी संपुष्टात येणार आहे. हा धोका लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर अपारंपरिक ऊर्जास्त्रोतनिर्मितीवर संशोधन सुरू आहे. यामध्ये स्वच्छ इंधन म्हणून हायड्रोजनकडे संशोधकांचा कल वाढला आहे. हायड्रोजन निर्मितीसाठी विविध पद्धती समोर येत आहेत. अशाच पद्धतीने 'टु डायमेन्शनल नॅनो मटेरियल्स'च्या वापरातून पाण्यापासून हायड्रोजन-निर्मितीबाबत कोल्हापूरच्या डॉ. जयवंत लक्ष्मण गुंजकर यांनी संशोधन केले आहे. तसेच तयार होणारी ऊर्जा बॅटरीमध्ये कशी साठवून ठेवता येईल, या विषयावरही त्यांनी संशोधन केले आहे.

डॉ. जयवंत गुंजकर

डॉ. गुंजकर मूळचे आजरा तालुक्यातील कोवाडेचे. त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण राजाराम कॉलेजमधून झाले. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातून एमएस्सी व पीएचडी संपादन केली. २००९ साली साऊथ कोरियातील इव्हा वुमन्स युनिव्हर्सिटीमध्ये पोस्ट डॉक्टरल रिसर्चसाठी त्यांची निवड झाली. त्यांनी २००९ ते २०१६ या कालावधीत रिसर्च प्रोफेसर पदापर्यंत मजल मारली. २०१७ साली डोंगुक विद्यापीठात सेऊल येथे सहायक प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांच्या या कामगिरीची दखल घेत भारत सरकारच्या विज्ञान आणि इंजिनिअरिंग अनुसंधान बोर्डातर्फे त्यांना रामानुजन फेलोशिप जाहीर केली. या फेलोशिपच्या माध्यमातून त्यांना सव्वा कोटींची स्कॉलरशिप प्रदान केली. जर्नल ऑफ अमेरिकन केमिकल सोसायटी व एनर्जी ॲण्ड एनव्हायर्न्मेंट सायन्स यामधून त्यांचे शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. ते सध्या डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीमध्ये कार्यरत आहेत.

नऊ पेटंट नावावर

डॉ. गुंजकर यांनी नऊ पेटंट मिळवले असून, यामध्ये पाच कोरिअन पेटंट व चार इंडियन पेटंटचा समावेश आहे. त्यांची 'नॅनो मटेरिअल्स' विषयावर तीन पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. त्यांची इंडियन नॅशनल यंग ॲकॅडमी ऑफ सायन्सेस या नामांकित संस्थेत सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीमध्ये सात विद्यार्थी पीएच.डी. करत आहेत.